जा.क्र.माध्य-४/काबग/कोवि/१४/
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर दिनांक :-

प्रति,

लेखाधिकारी,
लेखा परिक्षण पथक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

**विषय क्रमांक १ : वेतन निश्चितीमध्ये झालेल्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी प्राप्त झालेल्या अपिलावर निर्णय घेणे**
**सदर्भः-** कार्यबळ गट समिती बैठक दि. **१६/०७/२०१५**

| **अनु.क्र.** | **नाव शाळा** | **संबंधीत लेखाधिकारी यांचे अभिप्राय** | **निर्णय** |
|---|---|---|---|
| **१** | श्री. विष्णू बाबूराव हाळवणकर, प्रयोगशाळा सहायक, उत्तूर विद्यालय व ज्युनिअर कॉलेज उत्तूर, ता. आजरा जि.कोल्हापूर | यांची पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चतीची वेतनपडताळणी करतांना त्याच्या शिक्यामध्ये प्रयोगशाळा परिचरची वेतनश्रेणी (३०५०. ७५. ३९५०. ८०. ४५९०) अशी नमूद झाली असून रू. ३७९५/- या वेतनावर वेतन निश्चित करणेत आले आहे. तथापि प्रयोगशाळा सहायक या पदांची वेतनश्रेणी (३२००. ८५. ४९००) अशी आहे. त्यानूसार ३७८०/- या वेतनावर वेतन निश्चित होणे आवश्यक आहे. त्यानुसार पाचवा वेतन आयोगवेतननिश्चिती पडताळणी शिक्यामध्ये दुरूस्ती करणेस मान्यता असावी. तसेच १.१.२००६ रोजीची वेतनपडताळणी करतांना ग्रेड वेतन रू. २२००/- ऐवजी रू.२०००/- या ग्रेड वेतनावर वेतनपडताळणी होणे आवश्यक आहे. | श्री. हाळवणकर यांची वेतन निश्चिती ५ व्या वेतन आयोगानुसार प्रयोगशाळा सहायक या पदावर ३२००-८५-४९०० मध्ये फक्त शिक्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे. ( कोणताही फरक अनुज्ञेय नाही.) दि.०१.०१.२००६ रोजीचे ग्रेड वेतन बरोबर दिलेले आहे. तरी त्याप्रमाणे दुरूस्ती करण्यास सर्वनुमते निर्णय घेण्यात आला. |

| | | | |
|---|---|---|---|
| **२.** | श्री. धोंडीराम ज्ञानू कांबळे सेवानिवृत्त प्रयोगशाळा सहायक, राजर्षि छत्रपती शाहू हायस्कूल इचलकरंजी जि. कोल्हापूर , | हे दिनांक ३१/१२/२००८ रोजी नियतवयोमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्याची मुळ नियुक्ती दिनांक १६/१२/१९७५ असून त्यांचे सेवेमध्ये दिनांक २१/५/१९८१ ते ०४/०८/१९८१ अखेर २ महिने १५ दिवस सेवाखंड आहे. सदर सेवाखंड मा. शिक्षण उपसंचालक कोल्हापूर यांचे कडील पत्र क्र. माध्य-३ /कोवि/सेवाखंड/२६७३९-४१/दिनांक ०६/१०/२००८ अन्वये क्षमापित करण्यात आला आहे. त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण नियुक्ती दिनांक ०५/०८/१९८१ धरून मंजूर करणेत आले आहे. उपरोक्त सेवाखंडाचा कालावधी क्षमापित केला असल्याने त्यांनी प्रथम नियुक्ती दि. १६/१२/१९७५ पासून वेतन संरक्षण मिळणेबाबत विनंती केली आहे.<br>तथापि सेवाखंड क्षमापित केला असला तरी त्यांना वेतनाचे फायदे देता येणार नाहीत. असे लेखाधिकारी लेखापरिक्षण पथक (शिक्षण) यांचे मत आहे. फक्त सेवानिवृत्तीकरिता सेवाखंड क्षमापित फायदे देता येतील. त्यानुसार त्यांचे सुधारित सेवानिवृत्त प्रकरण तयार करुन सक्षम अधिकारी यांचे मान्यतेकरिता सादर करणे आवश्यक आहे. | मा. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर यांचे आदेश दि. ०६/१०/२००८ नुसार सदरचा सेवाखंड सेवानिवृत्ती लाभासाठी क्षमापित केलेला आहे. त्यामुळे वेतनाचे फायदे देता येणार नाहित .तथापि सदरचा निर्णय प्रशासकीय स्तरावर घेण्यात यावा. असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री. हिरेमठ मदन शंकरराव, सेवानिवृत्त मुख्याध्यापक , महाराष्ट्र हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज कोल्हापूर | यांचे दिनांक ०१/०१/१९९६ रोजीच्या वेतनपडताळणी बाबत आपलेकडील संदर्भीय पत्र अ.क्र.२ नुसार या कार्यालयाच्या स्तरावर निर्णय घेणेबाबत कळविण्यात आले होते.<br>त्यानुसार शासन निर्णय दि. २६.०२.२०१४ नुसार कनिष्ठ महाविद्यालयीन वेतनश्रेणी दिनांक ०१.०१.१९९६ पासून व्दिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यात आली आहे.<br>त्यानुसार लेखाधिकारी, लेखा परिक्षण पथक,कोल्हापूर यांनी दि. ०१.०१.१९९६ रोजीचे वेतन धरून श्री.हिरेमठ यांची वेतन पडताळणी केलेली आहे. तथापि त्यांनी दिनांक ०१.०७.१९९७ रोजीचे वेतन धरून शासन निर्णय दिनांक १३ मे १९९९ मधील नियम ७ नुसार वेतन पडताळणी करणेबाबत मागणी केली आहे. त्यामध्ये त्यांनी दिनांक ०१.०७.१९९७ रोजीचे वेतन रू. ३३००/- धरून वेतन निश्चितीकरिता विशेष सवलत मुळ वेतनाच्या ४० टक्के रक्कम धरून वेतन निश्चिती केलेली आहे. तथापि शासन निर्णय दिनांक १३ मे १९९९ असे नमूद केले आहे की, ०१.०१.१९९६ ते ३१.१२.१९९६ या कालावधीत येणाऱ्या त्यांच्या पुढील वेतनवाढीच्या ताराखेपासून सुधारित वेतनश्रेणीची निवड करतो त्याच्यबाबतीत नियम ५ च्या तरतूदीनुसार वेतननिश्चित करण्यात येईल. तथापि असा कर्मचारी १ जानेवारी १९९६ पासून सुधारित श्रेणी स्वीकारण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधी मध्ये मुळ वेतनाच्या ४० टक्के वाढीच्या रक्कम मिळण्यास पात्र असणार नाही. असे नमूद केले आहे. | शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. वेतन २०१४/प्र.क्र.२/१४/टीं .एन टी. ३ मंत्रालय विस्तार भवन मुंबई-४०००३२ दि. २६/०२/२०१४ मधील परिच्छेद ५ नुसार सदर वेतनश्रेणी ०१/०१/२००४ पासून स्वीकारणेचा विकल्प तीन महिण्याच्या आत (दि.२६/०५/२०१४ पुर्वी ) न दिलेने सदर शिक्षकाचे वेतन पुननिश्चित करता येणार नाही. असा सर्वानुमते निर्णय घेण्यात |

<table>
<tr>
<td>४.</td>
<td>श्री. दिलीप रामचंद्र मोहिते, प्रयोगशाळा सहाय्यक.</td>
<td>१. मोहिते हे दिनांक ०९-०८-१९९४ पासून कनिष्ठ महाविद्यालयाकडे व श्री. महेश गोविंद दिक्षित हे दिनांक २३-०१-१९९५ पासून माध्यमिक विभागाकडे वेतनश्रेणी ९७५-२५-११५०- दरो-३०-१५४० मध्ये प्रयोगशाळा सहाय्यक पदावर कार्यरत असून त्यांच्या नियुक्तीस सदर दिनांकापासून सक्षम अधिकाऱ्यांची परिविक्षाधिन कालावधीसह मान्यता प्राप्त आहे.(सदर मान्येची छायाप्रत सादर)<br>२. विद्यमान वेतनश्रेणी रू.९७५-२५-११५०-दरो-३०-१५४० मध्ये श्री. मोहिते हे.रू.१०००/- वेतन घेत होते व त्यांची पुढील वेतनवाढ दिनांक ०१-०८-१९९६ होती तर श्री. दिक्षीत हे रू.९७५/- वेतन घेत होते व त्यांची पुढील वेतनवाढ दिनांक ०१-०१-१९९६ होती. सदर वेतन विचारात घेऊन त्यांचे ५ वा वेतन आयोग - वेतनश्रेणी रू.३२००-८५-४९००- मध्ये खालीलप्रमाणे वेतन व पुढील वेतनवाढ दिनांक निश्चित करणेत आलेली आहे. सदर वेतननिश्चिती बरोबर आहे
<table>
<tr><td></td><td>श्री.मोहिते</td><td>श्री. दिक्षित</td></tr>
<tr><td>मुळ</td><td>१०००</td><td>९७५</td></tr>
<tr><td>१४८ टक्के महागई भत्ता</td><td>१४८०</td><td>१४४३</td></tr>
<tr><td>१ ली अंतरिम वाढ</td><td>१००</td><td>१००</td></tr>
<tr><td>२ री अंतरिम वाढ</td><td>१००</td><td>१००</td></tr>
<tr><td>मुळ वेतनाच्या ४० टक्के</td><td>४००</td><td>३९०</td></tr>
<tr><td>एकूण वित्तलब्धी</td><td>३०८०</td><td>३००८</td></tr>
<tr><td>सुधारित श्रेणीत पुढील</td><td>३२००</td><td>३२००</td></tr>
<tr><td>३ वेतन वाढीच्या</td><td>३२००</td><td>३२००</td></tr>
<tr><td>सुधारित श्रेणीत अंतिमतः</td><td>३२००</td><td>३२००</td></tr>
<tr><td>पुढील वेतनवाढ दिनांक</td><td>०१-०८-१९९६</td><td>०१-०१-१९९६</td></tr>
</table>
३. श्री. दिक्षित यांना विकल्पानुसार पुढील वेतनवाढ दिनांक ०१-०१-१९९६ दिल्याचे वेतननिश्चितीमध्ये तसेच त्याच्या सेवापुस्तकाच्या शेवटी चिकटवलेल्या वेतनश्चितीच्या विवरणपत्रामध्ये त्यांना नियम क्रमांक ०६ नुसार सुधारित वेतनश्रेणीतील वेतनवाढ दिलेली आहे.असे नमुद आहे.<br><br>४. उपरोक्त वेतननिश्चती विचारात घेता श्री. मोहिते व श्री. दिक्षित यांचे वेतन एकाच टप्प्यावर म्हणजे रू.३२००/- निश्चित झालेले आहे. तथापि, श्री. मोहिते हे श्री.दिक्षित यांच्यापेक्षासेवेने जेष्ठ असल्यामुळे शासननिर्णय दिनांक १३ मे, १९९९ मधील नियम क्रमांक ६ खालील परंतुकानुसार त्यांना देणेत आलेली पुढील वेतनवाढीची तारीख -०१-०१-१९९६- श्री. मोहिते यांना देणेबाबत तसेच या</td>
<td>सदर प्रकरण कार्यबळ गट कक्षेत येत नसून याबाबतचा निर्णय लेखाधिकारी, लेखापरीक्षण पथक, कोल्हापूर यांनी त्याच्या स्तरावर घेण्यात यावा.<br>असा सर्वनुमते निर्णय घेण्यात आला.</td>
</tr>
</table>

**सही/-**

**अध्यक्ष**

**तथा**

**शिक्षण उपसंचालक**

**कार्यबळ गट कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

जा.क्र.माध्य-४/काबग/कोवि/१५/
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
कोल्हापूर दिनांक :-

**विषय क्रमांक २ : खाजगी/संस्थेच्या मालकीचे इमारतीचे थकित भाडे मंजूर करणे**
**सदर्भ:-** कार्यबळ गट समिती बैठक दि. **१६/०७/२०१५**

| अनु.क्र | तपशील | शिक्षणाधिकारी यांचे अभिप्राय | निर्णय |
|---|---|---|---|
| १. | शाळेचे नाव :- **श्री. काळभैरव विद्यालय, वर्णे , ता. जि. सातारा**<br>संस्थेचे नाव :- **वर्णे ग्रामविकास मंडळ, वर्णे, ता.जि.सातारा** | शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. रत्नागिरी यांनी सदर शाळेचा **(टप्पा क्र. १)** , **०५** खोल्यांना दरमहा **३१२५/-**प्रमाणे दि. **दि. २१/०५/२००१** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | १०० % अनुदान झाल्याची प्रत इमारतीचा नकाशा व अंदाजपत्रक, ७/१२ व नमुना ८ अ उतारा मुळ भाडे करारनामा व प्रस्ताव जावक क्र.दिनांक यांच्या त्रुटी पुर्ततेसह दि. २१/०५/२००१ पासून मंजूरी देयकाबाबत निर्णय घेण्यात आला. |
| २. | शाळेचे नाव :- **श्री. काळभैरव विद्यालय, वर्णे , ता. जि. सातारा**<br>संस्थेचे नाव :- **वर्णे ग्रामविकास मंडळ, वर्णे, ता.जि.सातारा** | शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. कोल्हापूर यांनी सदर शाळेचा **(टप्पा क्र.२)**, **०४** खोल्यांना दरमहा **२४९२/-** प्रमाणे दि. **दि. १५/१०/२००७** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | |
| ३. | शाळेचे नाव :- **राजेंद्र विद्यालय खंडाळा, जि.सातारा**<br>संस्थेचे नाव :- **खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा, जि.सातारा** | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प. **सातारा** यांनी सदर शाळेच्या **२४** खोल्यांना दरमहा **२६१८६/-** प्रमाणे दि. **०१.०१.२००२** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.सातारा यांचे शिफारसी नुसार प्रस्ताव परिपुर्ण असल्याने **राजेंद्र विद्यालय खंडाळा, जि.सातारा** या शाळेचा दि.१ जानेवारी २००२ पासून १४ खोल्यांना रक्कम रूपये २६१८६/- इमारत भाडे मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. |
| ४. | शाळेचे नाव :- **रामेश्वर विद्यालय, विंग, ता. खंडाळा जि. सातारा**<br>संस्थेचे नाव :- **खंडाळा विभाग शिक्षण समिती खंडाळा, जि.सातारा** | शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. **सातारा** यांनी सदर शाळेच्या **११** खोल्यांना दरमहा **९२४१/-** प्रमाणे दि. **०१.०६.२००४** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.**सातारा** यांचे शिफारसी नुसार प्रस्ताव परिपुर्ण असल्याने **रामेश्वर विद्यालय, विंग, ता. खंडाळा जि. सातारा** या शाळेचा दि.१ जून २००४ पासून ११ खोल्यांना रक्कम रूपये ९२४१/- इमारत भाडे मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | शाळेचे नाव :- **श्री. गांगेश्वर विद्यालय, ससाळ ता. राजापूर जि. रत्नागिरी**<br>संस्थेचे नाव :- **ससाळे ग्रामविकास मंडळ, मुंबई** | शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. **रत्नागिरी** यांनी सदर शाळेच्या **०४** खोल्यांना दरमहा **३३८३/-** प्रमाणे दि. **०१.०३.१९९३** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.**रत्नागिरी** यांचे शिफारसी नुसार प्रस्ताव परिपुर्ण असल्याने **श्री. गांगेश्वर विद्यालय, ससाळ ता. राजापूर जि. रत्नागिरी** या शाळेचा दि.१ मार्च १९९३ पासून ०४ खोल्यांना रक्कम रूपये ३३८३/- इमारत भाडे मंजूर करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. |
| ६. | **शाळेचे नाव** :- निनाई हायस्कूल, परळे निनाई, ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर<br>**संस्थेचे नाव** :- दत्ता एज्युकेशन सोसायटी डोणोली (बांबवडे),<br>**इमारत मालकाचे नाव** :- सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, परळे निनाई वाकोली | शिक्षणाधिकारी (माध्य.)जि.प. **कोल्हापूर** यांनी सदर शाळेच्या **०५** खोल्यांना दरमहा **२७६६/-** प्रमाणे दि. **०१.०६.१९९९** पासून इमारत भाडे मंजूर करणेस शिफारस केली आहे. | इमारत भाडयाने देण्यास जि.प. परवानगी पत्र सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतला इमारत भाडयाने देण्याबाबतचा ठराव तसेच करारपत्रावर मुख्याध्यापकांची स्वाक्षरी इत्यादी त्रुटी पुर्ततेसह सदर भाडे प्रस्तावास मंजूर देणेबाबत निर्णय घेण्यात आला. |

**सही/-**
**अध्यक्ष**
**तथा**
**शिक्षण उपसंचालक**
**कार्यबळ गट कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**